"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/4277 /2022-23. दिनांक: 23/02/2023.

प्रति,

मुख्य प्रबंधक (निर्माण),
गेल (इंडिया) लिमिटेड, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

विषय:-**वन जमिन रायगड**
वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत उरण ते उसर गॅस पाईपलाईन टाकणेकरीता 3.8127 हेक्टर चा वन जमीन मागणीचा प्रस्ताव...
गेल (इंडिया) लिमिटेड, बेलापुर

संदर्भ:- 1) आपलेकडील पत्र क्र. गेल/युपी/अलिबाग/आरडी/फॉरेस्ट/01, दिनांक 13/06/2022.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/1349, दिनांक 06/07/2022.
3) आपलेकडील पत्र क्र. गेल/युयुपी/अलिबाग/आरडी/फॉरेस्ट/02, दिनांक 31/07/2022.
4) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/2056, दिनांक 16/09/2022
5) आपलेकडील पत्र क्र. गेल/युयुपी/अलिबाग/आरडी/फॉरेस्ट/03, दिनांक 11/01/2022.

उपरोक्त संदर्भित पत्र क्र. 5 अन्वये वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत उरण ते उसर गॅस पाईपलाईन टाकणेकरीता 3.8127 हेक्टर चा वन जमीन मागणीचा प्रस्तावात या कार्यालयाचे संदर्भित पत्र क्र. 2 अन्वये उपस्थित केलेल्या मुददयांचा पुर्तता करून अहवाल सुधारित प्रस्ताव या कार्यालयास एक प्रतीत दाखल केला आहे.

सदर प्रस्तावांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1. प्रस्तावित आखणी मार्गामध्ये बाधीत होणारे क्षेत्र विहीत विवरण तक्त्यासह प्रस्तावामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.
2. प्रस्तावित आखणी मार्गामध्ये बाधीत होणारे मौजे- भेंडखळ ता. उरण येथील 'वन' या संज्ञेतील स.नं. 340 दर्शविणे आवश्यक आहे.
3. प्रस्तावित आखणी मार्गामध्ये बाधीत होणारे वनजमीन मागणी क्षेत्राचे नकाशामध्ये वनाचे वैधानिक दर्जानिहाय रंगसंगतीने दर्शविणे आवश्यक आहे.
4. प्रस्तावित आखणीमार्गामध्ये बाधीत होणारे मौजे- नवघर ता. उरण येथील स.नं. 300 मध्ये MRSAC चे नकाशानुसार बाधीत होणारे कांदळवनाचे क्षेत्र दर्शविले नाही. तसेच स.नं. 333 चे MRSAC चे नकाशातील आखणी मार्ग व Google Image मधील आखणी मार्ग यामध्ये तफावत दिसुन येत आहे. त्यामुळे स.नं. 333 चे हद्दीची खात्री करणेकामी भुमी अभिलेख विभागाकील नकाशाची आवश्यकता आहे. तसेच भा.व.अ.1927 चे कलम 4 नुसार राखीव वन करण्यासाठीची अधिसुचना

क्र. एफएलडी-13/2022/प्र.क्र.121/फ-3 दिनांक-01/07/2022 व 28/09/2022 रोजी अधिसुचीत मौजे- नवघर ता. उरण येथील स.नं. 400 ते 425 चे क्षेत्र विहीत रंगसंगतीने नकाशामध्ये अधोरेखीत करणे आवश्यक आवश्यक आहे.

5. प्रस्तावित आखणीमार्गामध्ये बाधीत होणारे वनजमीन मागणी क्षेत्राचे Google Image वर Super Impose केलेले नकाशे प्रस्तावात समाविष्ट केले आहेत परंतु गावनकाशावर आखणी मार्ग दर्शवुन नकाशे सादर केले नाही. ते सादर करणे आवश्यक आहे.
6. मौजे- कोप्रोली तर्फ औरवळीत ता. उरण येथील स.नं. 61 चे क्षेत्र संरक्षित वनाचे चुकीचे दर्शविले आहे. तसेच मौजे- कचरेपाडा ता. उरण हे गाव मौजे- कोप्रोली तर्फ औरवळीत ता. उरण या गावातुन नविन गाव निर्माण झाल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे दोन्ही गावामधील नवीन/ जुने सर्व्हे नं. / गट नं. चा तपशील व दस्ताऐवज/ कागदपत्रे प्रस्तावात समाविष्ट करुन त्याप्रमाणे सदर गावातील वनक्षेत्र वैधानिक दर्जानिहाय दर्शविणे आवश्यक आहे.
7. प्रस्तावित आखणीमार्गामध्ये बाधीत होणारे मौजे- कळंबसुरे ता. उरण येथील स.नं. 122 बाबत प्रकल्पयंत्रणेकडुन पडताळणी होऊन अधिसुचना क्र. एफएलडी-13/2022/प्र.क्र.121/फ-3 दिनांक-01/07/2022 नुसार कलम 4 घोषित झालेले स.नं.168,169 चे क्षेत्र विहीत रंगसंगतीने नकाशामध्ये अधोरेखीत करणे आवश्यक आवश्यक आहे.
8. प्रस्तावित आखणीमार्गामध्ये बाधीत होणारे मौजे- साई ता. पनवेल येथील राखीव वन स.नं. 223 नकाशामध्ये विहीत रंगसंगतीने अधोरेखीत केलेला नाही.
9. प्रस्तावित आखणीमार्गामध्ये बाधीत होणारे मौजे- रावे ता. पेण येथील खाडीलगचे कांदळवनाचे क्षेत्र नकाशामध्ये दर्शविलेले नाही. याबाबत प्रकल्पयंत्रणेकडुन पडताळणी होणे आवश्यक आहे.
10. प्रस्तावित आखणीमार्गामध्ये बाधीत होणारे मौजे- कोपर ता. पेण येथील नवीन स.नं. 98 99 व 75/4 कांदळवन राखीव वन दर्शविणे आवश्यक आहे.
11. मौजे- कोप्रोली ता. उरण अधिसुचना क्र. एफएलडी-13/2022/प्र.क्र.121/फ-3 दिनांक-01/07/2022 नुसार कलम 4 घोषित झालेले क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.
12. मौजै- कचरेपाडा ता. उरण येथील स.नं. 94 चे लगत खाडीपात्राजवळ कांदळवनाचे क्षेत्र दिसून येत आहे. तरी प्रकल्पयंत्रणेकडून खात्री होणे आवश्यक आहे.
13. मौजे- दळवीखरोशी ता. अलिबाग येथील प्रस्तावात समाविष्ट क्षेत्र विवरण तक्त्यामध्ये राखीव वनाचा स.नं. / कक्ष क्रमांक दर्शविलेला नाही.
14. मौजे- भोंडखरोशी ता. अलिबाग या गावामध्ये जुने/नवीन सर्व्हे नं./गट नं. झाल्याचे दिसून येत असल्याने सदर क्षेत्राची खात्री करणेकामी जुने/नवीन सर्व्हे नं./गट नं. ची गट स्किम किंवा जुने/ नवीन सर्व्हे नं./गट नं. चा फेरफार प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक आहे.
15. मौजे- बोपोली ता. अलिबाग येथील स.नं. 4 अंतीम संपादित वनाचा दर्शविला नाही. तसेच अंतीम संपादित वन स.नं. 22/1 व 23 भाग आहे. नकाशामध्ये पुर्ण स.नं. अंतीम संपादित वन दर्शविला आहे. सदर क्षेत्राची खात्री करणेकामी भुमी अभिलेख विभागाकडील हिश्शेदर्शक नकाशाची आवश्यकता आहे. तसेच बोपोली गावाचा पुर्ण गाव नकाशा सादर केला नाही.
16. मौजे-शहापुर,शहाबाज यागावातील कांदळवनाचे क्षेत्र अधिसुचना क्र. एफएलडी-13/2021/ प्र.क्र.62/फ-3 दिनांक-05/03/2021 नुसार कांदळवन राखीव वन म्हणुन अधिसुचीत झाले आहे. त्याप्रमाणे वैधानिक दर्जा निहाय प्रस्तावात दर्शविणे आवश्यक आहे.
17. मौजे- कळंबसुरे, नवघर, भेंडखळ, धसाखोशी , कोप्रोली, जुई या गावातील कांदळवनाचे क्षेत्र अधिसुचना क्र. एफएलडी-13/2022/प्र.क्र.121/फ-3 दिनांक-01/07/2022 कलम 4 घोषित झाल्याने वैधानिक दर्जा निहाय प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

18. मौजे- नवघर, भेंडखळ, जुई या गावातील कांदळवनाचे क्षेत्र अधिसुचना क्र. एफएलडी-13/2022/प्र.क्र.215/फ-3 दिनांक-28/09/2022 कलम 4 घोषित झाल्याने वैधानिक दर्जा निहाय प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

19. मौजे- कोपर, डोलवी दबाबा, कणे, ओढांगी, वाशी, बोरवे, मसद खुर्द, बेणेघाट ता. पेण यागावातील कांदळवनाचे क्षेत्र अधिसुचना क्र. एफएलडी-13/2021/प्र.क्र.321/फ-3 दिनांक-20/01/2021 नुसार कांदळवन राखीव वन म्हणुन अधिसुचीत झाले आहे. त्याप्रमाणे वैधानिक दर्जा निहाय प्रस्तावात दर्शविणे आवश्यक आहे.

    तसेच मौजे- बेणेघाट स.नं. 80/2 चे क्षेत्र कांदळवन राखीव वन आहे. त्यामध्ये लांबी 124.67 मीटर दर्शविलेली आहे. त्याची पडताळणी करणेकामी नवीन स.नं.80/2, 82 व नवीन स.नं. 84 चे क्षेत्र भुमी अभिलेख यांचेकडील हिश्याचे नकाशे नुसार दर्शविणे आवश्यक आहे.

20. मौजे- कोळघर ता. अलिबाग येथील अवर्गीकृत वन दर्शविणे आवश्यक आहे.

21. मौजे- कुणे ता. अलिबाग या गावामध्ये जुने/नवीन सर्व्हे नं./गट नं. झाल्याचे दिसून येत असल्याने सदर क्षेत्राची खात्री करणेकामी जुने/नवीन सर्व्हे नं./गट नं. ची गट स्किम किंवा जुने/नवीन सर्व्हे नं./गट नं. चा फेरफार प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक आहे

22. Index Map प्रस्तावित आखणी मार्गापासुन नजीकचे अभयारण्य व पर्यावरण संवेदनशील क्षेत्रापासुनचे अंतर दर्शविणे आवश्यक आहे.

23. प्रस्तावित आखणी मार्गाचे नकाशे चेनेज नुसार प्रस्तावात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

24. प्रस्तावात समाविष्ट नकाशामध्ये राखीव वनास स.नं. / कक्ष क्रमांक नमुद केलेले नाही.

25. प्रस्तावांत मालकी क्षेत्रांस खाजगी वा इतर वनाच्या तरतुदी लागू झालेल्या आहेत अगर कसे याबाबत खात्री करणेकरीता त्या क्षेत्राचे जुने फेरफार, जुने/नवीन गावांत रुपांतर झाले असेल तर त्याबाबतचा फेरफार, गट एकत्रिकरण योजना, गट बुक नकाशा इत्यादी माहिती पुर्तता अहवालासोबत देण्यात यावी. जेणेकरुन ज्या क्षेत्राकरीता पाईपलाईन करीता क्षेत्र मागणी करणेत येत आहे. त्याबाबत खात्री करणे शक्य होईल.

26. प्रस्तावात जिल्हाधिकारी यांचेकडील वनहक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्र सामिल असणे आवश्यक आहे.

27. प्रस्तावांत सदर प्रकल्पाबाबत प्रोजेक्ट नोट प्रकल्प यंत्रणेचे लेटर हेडवर तयार करुन प्रस्तावांत समील करण्यात यावे.

28. प्रस्तावात क्षेत्र विवरण तक्क्यानुसार वनक्षेत्राचे 7/12 उतारे सामिल केलेले नाही. तरी वनक्षेत्राचे 7/12 उतारे प्रस्तावात सामिल करून ते आंग्ल भाषेंत भाषांतरित करून देखील प्रस्तावात सामिल करणे आवश्यक आहे.

29. प्रस्तावात क्षेत्र विवरण तक्क्यानुसार वनेतर क्षेत्राचे 7/12 उतारे सामिल केलेले नाही. तरी वनेत्तर क्षेत्राचे 7/12 उतारे प्रस्तावात सामिल करणे आवश्यक आहे.

**30.** वरील प्रमाणाने नकाशामध्ये दुरूस्ती होत असल्यास त्यानुसार परिवेश प्रणालीवर सुधारित नकाशा अपलोड करणेंत यावे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करून सुधारीत प्रस्ताव आवश्यकत्या दस्तऐवजासह आठ प्रती या कार्यालयास सादर करणेत यावा. सोबत प्रस्तावाचे सर्व संच परत करणेत येत आहेत.

(आशिष ठाकरे, भा.व.से)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहा.वनसंरक्षक, पनवेल/अलिबाग व वन परिक्षेत्र अधिकारी, उरण, पनवेल, पेण, वडखळ, अलिबाग यांना माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी.

2/- सदर प्रस्तावात वन परिक्षेत्र अधिकारी, उरण, पनवेल, पेण, वडखळ, अलिबाग यांनी मोका पहाणी करून बाधीत होणारे वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे अगर कसे याबाबत खात्री करुन जर वृक्षतोड होणार असेल तर बाधीत होणारे वृक्षांचे यादीसह वृक्षतोडीचे अंदाजपत्रक विहीत प्रपत्रात आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन आठ प्रती अंदाजपत्रक सहा. वनसंरक्षक, अलिबाग व पनवेल या कार्यालयास सादर करावा.

3/- तसेच प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्राचे दुप्पट पर्यायी वनीकरणाकरीता अवनत वनक्षेत्र सुचवून त्याबाबत पॉलीगॉन घेऊन त्याची माहिती या कार्यालयास पर्यायी वनीकरण योजना, लावगडीसाठी योग्य असल्याचे प्रमाणपत्र, नकाशेसह सादर करणेत यावी.

प्रतः वनक्षेत्र सर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय, अलिबाग यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.